# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

**दिनांक १७/०५/२०२१ (सोमवार)**

---

## —: अपघात :—

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ४ किमी अंतरावरील बिनासंगम येथे दिनांक १६/०५/२०२१ चे १७,४० ते १८.०० वा. दरम्यान यशवत उदाराम भुरे वय ६० रा बिना संगम वार्ड क्र १ यांचे टाटा कंपनी ट्रक क्र. एम. एच. ४० एन ३७८० ला उजव्या बाजुस प्रमोद हेमराज काकडे वय ४५ वर्ष रा. सिल्लेवाडा यांनी आपल्या ताब्यातील अशोक लेलॅन्ड कंपनीचा १६ चाकी निळया पांढया रंगाचा ट्रक एम.एच. ३४ ए.व्ही. १३९७ रस्त्यावर भरधाव वेगाने व निष्काळजीपणाचे चालवून धडक देवून झालेल्या अपघात स्वत: गंभीर जखमी होण्यास कारणीभुत ठरला व उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यशवत उदाराम भुरे वय ६० रा बिना संगम वार्ड क्र १ चे तोंडी रिपोर्ट वरुन मृतक प्रमोद हेमराज काकडे वय ४५ वर्ष रा. सिल्लेवाडा चे विरुध्द पो.स्टे. खापरखेडा येथे कलम ३०४ (अ), २७९, ३३८ भा.दं.वि.चा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि किरण शेवाळे मो.न.८६६८९ ६५६४८९ हे करीत आहेत.

## —: अकस्मात मृत्यु :—

**पो.स्टे. काटोल :—** अंतर्गत ११ किमी अंतरावरील मौजा थातुरवाडा येथे दिनांक १६/०५/२०२१ रोजी १२.०० वा. दरम्यान दिनेश रमेश मेंटागळे वय ३५ वर्ष रा. खापरी केने हा आपल्या लहान भाऊ विजय रमेशराव मेंटागळे वय ३० वर्ष रा खापरी केने यांचे घराचे बांधकाम करिता खडडा करीत असता, अचानक हवा गारड आल्याने दिवालला टेकुन ठेवलेली बल्ली डोक्यावर पडल्याने त्याचे डोक्याला मार लागल्याने रक्त निघल्याने उपचाराकरीता भिष्णुर ग्रामीण रूग्नालयात नेले असता, तेथील डॉक्टरांनी काटोल ग्रामीण रुग्णालय येथे रेफर केले तेथील वैघकीय अधिकारी यांनी दिनेश रमेश मेंटागळे वय ३५ वर्ष रा. खापरी केने यास तपासून मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी विजय रमेशराव मेंटागळे वय ३० वर्ष रा खापरी केने चे तोंडी रिपोर्ट व वैद्यकीय अधिकारी चे रिपोर्ट वरुन वरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आले असून पुढील तपास सफौ जवाहर चव्हाण मो.क्र. ९०६७९ ६७१८१ हे करित आहेत.

**पो.स्टे. खापा :—** अंतर्गत ०७ किमी अंतरावरील मौजा भेंडला शिवारात दिनांक १५/०५/२०२१ चे २२/०० वा. चे दरम्यान जगदिष रामकृष्ण मिलमिले वय ३० रा. वाकी यांनी कोणतेतरी अज्ञात कारणवरून आपले शेतातील सागवन चे झाडाचे फांदीला दोरी बांधुन गळफास घेवून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी मारोती गुलाबराव मिलमिले वय ३० रा. वाकी चे तोंडी रिपोर्ट चे रिपोर्ट वरुन वरुन पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आले असून पुढील तपास सफौ मुकंदा लोंडे मो.क्र. ९८५०९००७६८ हे करित आहेत.

**पो.स्टे. कुही :–** अंतर्गत ३० किमी अंतरावरील मटकाझरी तलाव जवळ असलेल्या दर्गा येथे दिनांक १५/०५/२०२१ रोजी ऋचित कृष्णराव कडु वय २६ वर्ष रा. प्लॉट नं. ८६ न्यु म्हाळगीनगर गजानन मंदीर नागपूर हा आपल्या मित्रासोबत पार्टी करण्याकरीता गेला असता दरम्यान तो आंघोळ करण्याकरीता तलावात गेला, परंतु त्याला पोहता येत नसल्याने खोल पाण्यात जावुन बुडुन मरण पावला

सदर प्रकरणी फिर्यादी ग.भा मीराबाई ईश्वर सुरड वय ६४ वर्ष रा. प्लॉट नं. ८६ न्युमहाळगी नगर गजानन मंदीर नागपूर जि. नागपूर चे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आले असून पुढील तपास पोहवा दिलीप लांजेवार मो.क्र. ९८८१०९३५२९ हे करित आहेत.

**पो.स्टे. पारशिवनी :–** अंतर्गत १० किमी अंतरावरील तामसवाडी येथे असलेल्या गोपाल मेहाडीया यांचे ईट भट्टीवर आपल्या मोठया भाऊ सोबत मजुरी करणारा विनोदकुमार रामकिसन बनबासी वय ४५ रा. सरवादुबान पो. स्टे सहाबंगंज तह लालगज जि.प्रतापगड (उ.प्र.) ह. मु. तामसवाडी यांनी दिनांक १६/०५/२०२१ रोजी ०७.०० वा. दरम्यान अज्ञात कारणाने दारूच्या नशेत तामसवाडी शिवारातील सुबाबुलच्या झाडाला शेंदरी रंगाचे दुपटटयाने गळफास लावुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी रामसिरोमन रामकिशोर बनबासी वय ४७ रा. सरवादुबान पो.स्टे सहाबंगंज तह लालगज जि. प्रतापगड (उ.प्र.) ह मु. तामसवाडी चे तोडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जा. फौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आले असून पुढील तपास पोहवा प्रभाकर झोड मो.क्र. ८८०६३५३४४६ हे करित आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर